रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळ, मुंबई कार्यालयातील अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.
शासन निर्णय क्र.एसपीबी-२०१७ / प्र.क्र.९२ / सां.का.१
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १० ऑक्टोबर, २०१७

संदर्भ: १) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२००१/प्र.क्र.२९८/ सां.का.१, दि.२३.०३.२००६.
२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र.एसपीबी-२०१६/प्र.क्र.४७/सां.का.१, दि.१८.०२.२०१७.
३) वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.पदनि २०१६/प्र.क्र.८/आ.पु.क., दि.०३.१०.२०१७

शासन निर्णय : संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये सांस्कृतिक कार्य या उपविभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या क्षेत्रीय कार्यालयामधील पदांचा आढावा घेऊन पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मान्यता देण्यात आलेली आहे. या आकृतीबंधानुसार रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळ, मुंबई या कार्यालयासाठी मंजूर करण्यात आलेल्या अस्थायी पदांना संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये दि.३०.०९.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. आता वित्त विभागाने संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागाला प्रदान केलेल्या अधिकारात रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळ, मुंबई या कार्यालयातील पुढील अस्थायी पदांना या शासन निर्णयान्वये दि.३१.१२.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यास शासन मंजूरी देत आहे.

अ.क्र.	पदनाम	पदसंख्या	वेतनश्रेणी रु.
१	लिपिक / टंकलेखक-	०१	५२०० - २०२००
२	दप्तरी	०१	५२०० - २०२००
३	शिपाई	०२	५२०० - २०२००
४	लघुलेखक	०१	रु.१०,०००/-
	एकुण- ०४ पदे	०५	

२. उपरोक्त पदे ज्या प्रयोजनार्थ निर्माण केली आहेत त्याच प्रयोजनार्थ या पदांचा विनियोग करण्यात यावा. या पदांपैकी कोणतेही पद सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी रिक्त नसावे. यावर होणारा खर्च “मागणी क्रमांक झेडडी-२, २२०५ कला व संस्कृती (०२) (०१) राज्य रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षक मंडळाचे कार्यालय (२२०५ १३८३)” या लेखाशिर्षाखाली सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षासाठी मंजूर केलेल्या तरतूदीतून करण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१७१०१०१७४११९९३२३ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Vidya Vasant Kadam
Date: 2017.10.12 10:54:20 +05'30'

(वि.व.कदम)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सचिव, रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळ, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा व परीक्षा) एक, महाराष्ट्र, मुंबई.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) एक, महाराष्ट्र, मुंबई.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६. वित्त विभाग (व्यय १४), मंत्रालय, मुंबई.
७. निवड नस्ती - सां.का.१